''कॉ. शरद पाटील यांच्या इतिहास लेखन कार्याचा अभ्यास''

इतिहास विषयाच्या पीएच्. डी. शोधप्रबंधाची रुपरेषा :

**** प्रास्ताविक :***

१८ व्या शतकाच्या मध्यन्हांनंतर जगात प्रारंभ झालेल्या औद्योगिकरणाने अखिल मानवी जीवनात आमुलाग्र बदल होवू लागलेत. इंग्लंडमध्ये सुरू झालेले हे औद्योगिकरण व्यापक होत जावून जागतिक पातळीवर पोहचले. मोठ्याप्रमाणात कारखानदारीचा प्रसार झाल्याने शेती व्यवसाय मोडकळीस आला. त्याचाच परिणाम म्हणून शेतकरी व शेतमजूर हा वर्ग जावून भांडवलदार व कामगार वर्गाचा उदय झाला. भांडवलदारांकडून कामगारांचे शोषण होवू लागल्याने समाजवादी विचारांचा उदय झाला. कार्ल मार्क्स ह्या विचारवंताने समाजवादी विचारसरणीला शास्त्रीय स्वरूप देवून समाजवादाचे तत्त्वज्ञान मांडले. या तत्त्वज्ञानावर आधारित रशियामध्ये साम्यवादी क्रांती यशस्वी झाल्याने भारतातही या विचारांचा स्वीकार करण्याचा विचार बळावला.

समाजवादी विचारांची जागतिक पातळीवर यशस्वी वाटचाल पाहून पंडित नेहरुंसारखी युवा पिढीही भारावली. याचाच परिणाम म्हणज़े पुढे प्रांतीय समाजवादी पक्षाची स्थापना झाली. ना. ग. गोरे, जयप्रकाश नारायण, अशोक मेहता यांच्यासारखी नेते मंडळी प्रभावित होवून सन १९३४ मध्ये श्री. संपूर्णानंदजींच्या अध्यक्षतेखाली मुंबईमध्ये काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीची स्थापना करण्यात आली. पंडित जवाहरलाल नेहरुंनी तर समाजवादाचा स्वीकार हे राष्ट्रीय सभेचे ध्येय असल्याचे जाहीर केले. असे असले तरी काँग्रेसशी मैत्री करावी किंवा करू नये यावरून कम्युनिस्टांमध्ये माकप आणि भाकप अशा दोन पक्षांची निर्मिती झाली.

महाराष्ट्राच्या पातळीवरही हे दोन्ही पक्ष स्वतंत्ररित्या वाटचाल करीत राहीले. महत्त्वाचे म्हणजे धुळ्यातील प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील हे माकपचे सरचिटणीस म्हणून काम पाहू लागले. मात्र माकपमधील केंद्रिय नेतृत्वाकडून ब्राह्मणेतरांना सन्मानाची वागणूक मिळत नसल्यामुळे शरद पाटील यांनी माकपचा राजीनामा दिला. एवढेच नव्हे तर 'सत्यशोधक कम्युनिस्ट' हा स्वतंत्र पक्ष स्थापन करून या पक्षाच्या माध्यमातून त्यांनी आपले पुढील कार्य सुरू केले. आपल्या पक्षाच्या ध्येय–धोरणांकरिता संशोधनात्मक असे लेखन करून त्यांनी कार्यकर्त्यांना मोठी दिशा दिली. सन १९५७ मध्ये संशोधनातून 'दासशूद्रांची गुलामगिरी' या ग्रंथाच्या लेखनकार्यास सुरूवात केली. तर सन १९९६ च्या शेवटी 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या ग्रंथाचा २ रा खंड प्रकाशित केला. सन २००३ मध्ये 'जातन्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती हा ग्रंथ वाचकांसमोर आणला.

कॉ. शरद पाटील यांनी सन १९४६ पासून जीवनदानी कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून आपल्या कार्याला सुरूवात केली. अभ्यासमंडळे चालवून धुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागात आदिवासी व सामान्य शेतकरी–शेतमजूर वर्गामध्ये जाणिवा निर्माण केल्यात. याकरिता त्यांनी डांगे आणि एंगल्स यांच्या साहित्याचा अभ्यास केला. असे असले तरी प्रा. शरद पाटील यांना खरी प्रेरणा डॉ. धर्मेंद्रनाथ शास्त्री लिखीत 'क्रिटिक ऑफ इंडियन रिॲलिझम' या ग्रंथातूनच मिळाली. कॉ. शरद पाटील यांनी पारंपरिक मार्क्सवादी विचारसरणीचा स्वीकार न करता वर्णजातिवर्गवादी विचारसरणीचा स्वीकार केला. आपल्या वर्णजातिवर्गवादी विचारसरणीलाच त्यांनी सन १९७८ पासून मार्क्सवादी फुले–आंबेडकरवादी' अन्वेषण पद्धत असे संबोधन दिले. याच अन्वेषणपद्धतीच्या अनुषंगाने त्यांनी इतिहास लेखन आणि संशोधन क्षेत्रात मोठे योगदान दिले.

धुळे तालुक्यातील आणि जिल्ह्यातील कापडणे या सत्यशोधकी वारसा जपणाऱ्या गावात कॉ. शरद पाटील यांचा जन्म झाला. धुळे जिल्ह्याच्या या परिसराला महाराष्ट्राच्या इतर मोठ्या शहरांसारखी वैचारिक पार्श्वभूमी नसली तरी याच परिसरातून कॉ. शरद पाटील सारख्या प्राच्यविद्यापंडितांची राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवर इतिहास संशोधक आणि लेखक म्हणून कामगिरी म्हणजे या परिसराचे मोठे भाग्यच होते. जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्, मुंबई येथे शिकत असतांनाच सन १९४५ च्या देशव्यापी संपामध्ये ते सहभागी झालेत. पुढे आपल्या परिसरात जीवनदानी कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून कार्यरत राहून महिला, शोषित–वंचितांच्या उत्थापनाकरिता कार्य करू लागले.

विषयाचे महत्त्व व ओळख :

कॉ. शरद पाटील यांचे संस्कृत भाषेवर प्रभुत्व असल्यामुळे प्राच्यविद्यांच्या अध्ययन–अध्यापनातून ब्राह्मणी व्यवस्थेच्या वाटचालीत स्त्रीशूद्रातिशूद्रांवर कशाप्रकारे अन्याय होत आला याचे विवेचन त्यांनी केले. याकरिता ब्राह्मणी वर्गाने साहित्य निर्माण करून त्याद्वारे दीर्घकाळ संपूर्ण समाजावर आपले प्रभूत्व टिकवून ठेवले. यातून स्त्रीशूद्रांची मुक्तता होण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केलेत. यामध्ये प्रारंभीच्या सुधारकांनी आपली समाज आणि धार्मिक सुधारणा ही वर्गीय सुधारणेच्या चौकटीतच ठेवल्याने स्त्रीशूद्रांना सर्वंकष सुधारकांच्या उदयापर्यंत वाट पहावी लागली. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्यांनी शिक्षणाची आवश्यकता पटवून देवून स्त्रीशूद्रांच्या उत्थापणासाठी संपूर्ण आयुष्य वाहून घेतले. त्यांच्याच कार्यामुळे या देशात सर्वंकष सुधारणेच्या वाटचालीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. त्यांनी मुलींकरिता आणि अस्पृश्यांकरिता शाळा काढून प्रस्थापित व्यवस्थेला मोठा हादराच दिला होता. पुढे छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फुले दाम्पत्यांचे हे कार्य व्यापक पातळीवर नेवून राष्ट्रीय पातळीवर मोठ्या चळवळी उभारल्यात. म्हणूनच स्त्रीशूद्रांची मुक्तता हा विषय राष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न

बनल्याने सर्वच क्षेत्रात मंथन घडून आले. हाच विचारप्रवाह कॉ. शरद पाटील यांनी आपली शिदोरी स्वीकारुन फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारेला मोठे योगदान दिले. याकरीता त्यांनी धुळे जिल्ह्यात अभ्यासवर्गाद्वारे, संशोधन साहित्य निर्माण करून, राजकीय पक्षाची स्थापना करून मोठे योगदान दिले.

कॉ. शरद पाटील यांनी आपल्या विद्वत्तेवर ब्राह्मणी विचारांची अभ्यासपूर्ण शास्त्रीय चिकित्सा केली. ब्राह्मणी साहित्यामुळेच प्रस्थापित व्यवस्था आजपर्यंत टिकून राहिली व त्यामुळेच स्त्रीशूद्रांची सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात मोठी कोंडी झाली. त्यांच्या मुक्ततेकरीता कॉ. शरद पाटील यांनी प्रागतिक असे साहित्य निर्माण करून स्त्रीशूद्रांच्या मुक्ततेचा आग्रह धरला. याच अनुषंगाने येणाऱ्या बाबींचा अभ्यास करण्याकरिता प्रस्तुत विषयावरील संशोधनाचे कार्य मी हाती घेतले.

आपल्या देशातील विचारवंतामध्ये समाजवादी विचारवंत म्हणून आणि कम्युनिस्ट चळवळीत कॉ. शरद पाटील यांचे स्थान फार महत्त्वाचे राहीले आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची प्राच्यविद्यापंडित म्हणून मोठी ख्याती आहे. वयाच्या २० व्या वर्षापासूनच जीवनदानी कम्युनिस्ट कार्यकर्ते म्हणून त्यांनी वाटचाल सुरू केली. धुळे जिल्हा हा त्यांचे कार्यक्षेत्र राहिल्याने आदिवासी आणि स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या उत्थापनाकरीता त्यांनी लढा उभा केला. समाजातील विषमताधिष्ठीत आरिष्ट घालवून समताप्रधान समाजाच्या उभारणीसाठी शेवटपर्यंत ब्राह्मणी विरुद्ध अब्राह्मणी संघर्षाचे स्वरूप त्यांनी उलगडून दाखविले. यात त्यांना तुरुंगात जावे लागले तरी ते आपल्या क्रांतीकारी विचारांपासून परावृत्त झाले नाहीत.

धुळे जिल्हा हा बहुसंख्य आदिवासी जनसमुहाच्या वास्तव्याचा परिसर म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यातील साक्री तालुक्यासारख्या आदिवासी भागामध्ये त्यांनी जीवनदानी कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून कार्यास प्रारंभ केला. शेतकरी, शेतमजूर व आदिवासींमध्ये आपल्या कार्याद्वारे जाणिवा निर्माण केल्यात. याकरिता त्यांनी अभ्यासमंडळाद्वारे कार्य सुरू केले या करिता त्यांनी पुरक संशोधनातून साहित्य निर्मिती करून वर्णजातिवर्गवादी अन्वेषण पद्धतीचा अवलंब केला. याच अन्वेषण पद्धतीला पुढे मार्क्सवादी-फुले-आंबेडकरी अन्वेषण पद्धती असे संबोधन दिले. याच अन्वेषण पद्धतीद्वारे कॉ. शरद पाटील यांनी ब्राह्मणी ज्ञानसत्तेला आव्हान देवून ऐतिहासिक संशोधनात मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या या इतिहास लेखन कार्याचा संशोधनात्मक अभ्यास मी करणार आहे.

* संशोधनाचा हेतू :

आजपर्यंत इतिहास लेखनाची केंद्रस्थाने ही राजे-रजवाडे, संरजामदार, जमीनदार, सरदार आणि समाजातील उच्चवर्णीय घटक हीच राहिली आहेत. या घटकांचा पराक्रम, रितीरिवाज, सण-उत्सव त्यांनी दिलेले योगदान किंवा स्त्रिया आणि शूद्र यांच्यावर लादलेल्या बाबींचाच इतिहास लेखनात समावेश

होत आला. मात्र अलिकडे सर्व सामान्यांचेही म्हणजेच स्त्रिया व शोषित–वंचितांनाही इतिहास असतो तो संशोधित झाला पाहिजे, लिहिला पाहिजे या जाणिवा निर्माण होवू लागल्यात. त्याकरीता बहुजन समाजातील विद्वानांनी संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवून प्राचीन साहित्याचा अभ्यास करून नव्यानेच इतिहासाची मांडणी करण्याचे अवघड कार्य हाती घेतले. यात धुळ्यासारख्या ग्रामीण भागात होवून गेलेल्या कॉ. शरद पाटील यांनी बहुजन नायक–नायिकांचे ऐतिहासिक योगदानाबरोबरच ब्राह्मणी इतिहास लेखनातील संकुचितपणावर आघात करून व्यापकतेने इतिहास लेखनात मोठे योगदान दिले आहे. प्राचीन साहित्य व वाङ्मय, मार्क्सवादी–फुले–आंबेडकरी विचारधारा, मराठ्यांची कामगिरी, शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचे कार्य, स्त्री–शूद्रातिशूद्र, आदिवासी समाज या बाबींचे संशोधनात्मक लेखन केले आहे. स्त्री–शूद्रातिशूद्र, आदिवासी यांच्या उत्थापनाकरिता त्यांनी राजकीय, सामाजिक व साहित्यिक लढा देवून मोठे ऐतिहासिक योगदान दिले आहे. या कार्याचे ऐतिहासिक मूल्यमापन करणे हा अभ्यासाचा हेतू आहे.

** संशोधनाची उद्दिष्टे :*

आपल्या देशातील धार्मिक आणि सामाजिक जीवन हे भेदग्रस्त आहे. धर्म आणि धर्मातील जातिप्रथा आणि त्याअनुषंगाने येणाऱ्या अनिष्ट रुढी–परंपरा यामुळे उदात्त आणि उन्नत मनुष्याची जाण राहीली नाही. ब्राह्मणी व्यवस्थेने प्रस्थापितांचा इतिहास सोयीने लिहून तो स्त्री–शुद्रातिशूद्रांवर लादण्यात आला. आपल्यावरील अत्याचाराच्या विरोधातून विद्रोही चळवळ उभी राहीली. मात्र तो विचारप्रवाह प्रभावी होण्यापासून नष्ट करण्याचेच प्रयत्न झालेत. अशा परंपरांचा इतिहास संशोधित करून त्याची पुर्नमांडणी कॉ. शरद पाटील यांनी आपल्या लेखनातून केली आहे. अशा बाबींचा सम्यक पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

१) कॉ. शरद पाटील यांच्या वैचारिक स्थित्यंतराचा अभ्यास करणे.

२) कॉ. शरद पाटील यांच्या गौतम बुद्ध, म. फुले, डॉ. आंबेडकर यांच्या प्रभावातून विकसित झालेल्या मार्क्स–फुले–आंबेडकरी अन्वेषण पद्धतीचा अभ्यास करणे.

३) ब्राह्मणी व्यवस्थेने बहुजन नायक–नायिकांचे केलेले विद्रुप स्वरूप कॉ. शरद पाटील यांनी सुस्वरूपातील केलेल्या मांडणीचा शोध घेणे.

४) प्राच्यविद्यापंडित म्हणून कॉ. शरद पाटील यांच्या इतिहास लेखन कार्याचा अभ्यास करणे.

५) कॉ. शरद पाटील यांनी स्त्री–शुद्रातिशूद्रांच्या उत्थानाकरिता केलेल्या कार्याचे मूल्यमापन करणे.

६) आदिवासींच्या विकासाकरिता कॉ. शरद पाटील यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा आणि कार्याचा आढावा घेणे.

७) कॉ. शरद पाटील यांच्या मराठ्यांच्या इतिहासातील योगदानाचे समालोचन करणे.

८) कॉ. शरद पाटील यांनी चालविलेल्या 'सत्यशोधक मार्क्सवादी' या मासिकातून आणि सत्यशोधक कम्युनिस्ट चळवळीच्या माध्यमातून आदिवासी व दलित महिला, शेतकरी, शेतमजूर यांच्या उत्थापनाकरिता केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

* संशोधनाची गृहीतकृत्ये :

कॉ. शरद पाटील यांनी प्रारंभी वर्णजातिवर्गवादी अन्वेषण पद्धतीचा स्वीकार करून इतिहास लेखन केले असले तरी पुढे या अन्वेषणपद्धतीचे स्थित्यंतर मार्क्सवादी–फुले–आंबेडकरी अन्वेषणपद्धतीत झाले. त्याअनुषंगाने त्यांच्या ऐतिहासिक लेखन कार्याचा अभ्यास करून गृहीतकृत्ये निश्चित केली आहेत.

१) आपल्या देशात सर्वच क्षेत्रात समता प्रस्थापित करावयाची असेल तर कॉ. शरद पाटील यांच्या वर्णजातिवर्गवादी विचारांचा स्वीकार करण्याशिवाय पर्याय नाही.

२) कॉ. शरद पाटील यांच्या मार्क्सवादी–फुले–आंबेडकरवादी अन्वेषणपद्धतीच्या अनुषंगाने केलेले इतिहास लेखन हे ब्राह्मणी व्यवस्थेला प्रचंड हादरा देणारे आहे.

३) कॉ. शरद पाटील अब्राह्मणी इतिहास लेखनाच्या स्वीकारातूनच स्त्रीया व शोषित–वंचितांच्या योगदानाला न्याय प्रदान करता येईल.

४) कॉ. शरद पाटील यांनी शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांविषयी केलेल्या लेखनामुळे मराठा इतिहास लेखनाला एक वास्तववादी असा नवा आयाम प्राप्त झाला.

५) आदिवासींकरिता स्वतंत्र मतदार संघ आणि विद्यापीठाची निर्मिती या मागण्या मान्य होणे शक्य नाही.

६) आदिवासी महिलांकरिता हिंदू–कोड बील लागू करण्यात यावे. ह्या कॉ. शरद पाटील यांच्या मागणीच्या फलश्रृतीकरिता आदिवासी महिलांकडून जाणिवपूर्वक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

७) कॉ. शरद पाटील यांचे प्रागतिक आणि वैज्ञानिक व्यापक विचार सर्वसामान्यांना आकलन होण्याच्या दृष्टीने समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

८) कॉ. शरद पाटील यांच्या लेखनातून स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या कक्षा उदात्त आणि व्यापक बनल्या आहेत.

* संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

कॉ. शरद पाटील यांनी ब्राह्मणी विरुद्ध अब्राह्मणी विचार प्रवाहाची मांडणी करून मार्क्सवादी–फुले–आंबेडकरवादी अन्वेषणपद्धतीचा स्वीकार केला. याच विचार प्रवाहाच्या परिप्रेक्ष्यातून समताधिष्ठित समाज रचनेकरिता इतिहास लेखन केले. कॉ. शरद पाटील यांचे ऐतिहासिक योगदानाला प्रत्यक्ष वास्तववादी

स्वरूप प्राप्त झाले तर सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील विषमता हद्दपार करता येईल आणि वर्गजातिअंताचा लढा यशस्वी होवू शकेल. हाच दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून कॉ. शरद पाटील यांचे इतिहास लेखनातील योगदानावर प्रस्तुत संशोधनाद्वारे लेखन करणार आहे.

असे असले तरी कॉ. शरद पाटील यांचे लेखन आणि त्याचा अवाका खूप मोठा आहे. त्यांनी अनेकविध संशोधनग्रंथामधून आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यातून प्राचीन काळापासून अनेक ऐतिहासिक घटनांचा 'सबाल्टर्न हिस्ट्री' च्या अनुषंगाने शोध घेवून त्याची साधारणपणे मांडणी केली आहे. तसेच 'सत्यशोधक मार्क्सवादी' या मासिकातून सत्येतिहास मांडला आहे. शोषित–वंचित, श्रमजीवी, आदिवासी या घटकांच्या उत्थानाकरिता अभ्यासशिबीरे घेवून, प्रत्यक्ष भाषणे, चर्चासत्रे, वृत्तपत्रांमधील लेखन यातून ऐतिहासिक बाबींच्या व प्रचलित काळातील परिस्थितीची मिमांसा केली आहे. म्हणून सर्वच बाबींची नोंद प्रस्तुत विषयावरील शोधप्रबंधांच्या लेखनात घेता येणे शक्य नाही. प्रबंध प्रकरणानुसार विशिष्ट बाबींशी निगडीत अशा ऐतिहासिक लेखन कार्याचाच अभ्यास करण्यात येईल.

**** साहित्याचे पुनरावलोकन :***

आधुनिक भारताच्या प्रबोधकार्यात कॉ. शरद पाटील यांचे लेखन महत्त्वाची भूमिका बजावणारे ठरते. त्यांनी दिलेल्या ऐतिहासिक योगदानावरच आपल्या देशातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक क्षेत्रातील विषमतेविरुद्ध लढा देता येईल. सर्वसामान्याच्या उत्थापनाकरिता कॉ. शरद पाटील यांच्या विचारांचा आणि लेखनाचा आढावा घेणे आवश्यक आहे.

कॉ. शरद पाटील हे सन १९६५ मध्ये पुणे येथे येरवडा कारागृहात तुरुंगात असतांना डॉ. धर्मेद्रनाथ शास्त्री लिखीत 'क्रिटिक ऑफ इंडियन रिऑलिझम' ग्रंथ वाचण्यात आला. यातूनच त्यांना खऱ्या अर्थाने प्रेरणा मिळाली. स्त्री–शुद्रातिशूद्रांची प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या गुलामगिरीतून मुक्तता करावयाची असेल तर ज्ञानाशिवाय पर्याय नाही हे कळून चुकले. याकरिता कॉ. शरद पाटील यांनी स्वत: लेखनातून स्त्री–शूद्रातिशूद्रांना आणि बहुजनांना नवी दृष्टी दिली. याकरिता इ.स. १९८२ मध्ये 'दासशूद्रांची गुलामगिरी' खंड १, भाग १, आणि इ. स. १९८७ मध्ये भाग २ लिहून वाई जि. सातारा येथील ज्ञान प्रकाशनामार्फत प्रकाशित केले. या संशोधन ग्रंथातून बुद्धकालापर्यंत भारतीय इतिहासावर लेखन करून अब्राह्मणी अन्ववेषणपद्धतीद्वारे इतिहासाची सम्यकतेने मांडणी केली.

पुढे सन १९९३ मध्ये पुणे येथील सुगावा प्रकाशनामार्फत 'मार्क्सवादी–फुले–आंबेडकरवाद' हा ग्रंथ प्रकाशित केला. यातून कॉ. शरद पाटील यांनी 'मार्क्सवाद–फुले–आंबेडकरवाद' या नव्या अन्वेषणपद्धतीच्या आणि तत्त्वज्ञाच्या परिप्रेक्ष्यातून आपले विचार मांडलेत.

इ. स. १९९६ मध्ये 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या ग्रंथाचा खंड २ सुगावा प्रकाशतर्फे प्रकाशित केला. प्रस्तुत ग्रंथातून कॉ. शरद पाटील यांनी भारतीय जातीव्यवस्थेचा उगम आणि विकास याचा मागोवा घेतला आहे. महत्त्वाचे म्हणजे वर्णप्रथेच्या अस्त होण्यातूनच जातिप्रथेचा उगम झाला असल्याची सैद्धांतिक मांडणी कॉ. शरद पाटील यांनी केली आहे.

कॉ. शरद पाटील यांचा 'रामयण–महाभारतातील वर्णसंघर्ष' हा ग्रंथ सन १९८६ मध्ये शिरुर येथील मावळाई प्रकाशनामार्फत प्रकाशित झाला. या संशोधन ग्रंथातून त्यांनी समाजाला प्रचलित विचार प्रवाहापासून परावृत्त केले. एवढेच नव्हे तर नव्या विषयाच्या अनुषंगाने विचारप्रवणता दिली. कारण रामायण म्हणजे राम–रावण समर प्रसंगाचे वर्णन आणि महाभारत म्हणजे पांडव–कौरव या चुलत भावांमधील समर प्रसंगाचे वर्णन, असा प्रचलित प्रवाह आहे. मात्र कॉ. शरद पाटील यांनी या दोन्ही महाकाव्यांमध्ये मातृसत्ताकते विरुद्ध पितृसत्ताकतेचा संघर्ष म्हणजेच रामाविरुद्ध सीता आणि पांडवांविरुद्ध द्रौपदी असा संघर्ष असल्याचे सप्रमाण दाखवून दिले आहे.

सन १९९२ मध्ये मावळाई प्रकाशन, शिरुर यांनी कॉ. शरद पाटील यांचा 'शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण – महंमदी की ब्राह्मणी ?' हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथात निश्चलपुरीच्या नेतृत्वात संपन्न झालेला दुसरा तांत्रिक राज्यभिषेक त्याची कारणमिमांसा, धार्मिक दृष्टिकोनातून समालोचन आणि महाराजांचा शैवविवाह याची यथासांग चर्चा करून कॉ. शरद पाटील यांनी मराठा इतिहासाला एक नवा आयाम प्राप्त करून दिला.

'नामांतर औरंगाबाद आणि पुण्याचे' ही अवघ्या ३४ पृष्ठांची पुस्तिका कॉ. शरद पाटील यांची डॉ. सुभाष गवारी यांनी आपल्या मावळाई प्रकाशनामार्फत २०११ मध्ये प्रकाशित केली. यातून संभाजी महाराजांची विद्वत्ता कशी थोर होती हे ऐतिहासिक दाखल्यांनिशी लिहिले आहे. शिवरायांच्या वैदीक राज्यभिषेकानंतर शुद्रातिशूद्रद्वेष्ट्या ब्राह्मणी धर्मातून सुटका जातिधर्म न पाळणाऱ्या शाक्त धर्माच्या स्वीकारातूनच होऊ शकते, असे संभाजी महाराजांनी सांगितले होते. तसेच मलिक अंबरने खडकी या शहराला बहामनीच्या राजधानीचा दर्जा दिला. म्हणूनच खडकी (औरगांबाद) हे एक सुंदर शहर बनले तर संभाजी महाराज व कवी कलश यांची भीषण हत्या पुणे लगतच्या परिसरात झाली. म्हणूनच पुण्याला संभाजी नगर व औरंगाबादला मलिकंबराबाद अशी नावे देणेच उचित होते, अशी ऐतिहासिक चिकित्सा या पुस्तीकेतून कॉ. शरद पाटील यांनी केली आहे.

प्रस्तुत विषयावरील शोधप्रबंधातून सर्वसामान्यांबरोबरच स्त्री–शुद्रातिशूद्रांच्या ऐतिहासिक स्थान महात्म्यविषयीची माहिती व्हावी या प्रामाणिक हेतूच्या साध्यार्थासाठी कॉ. शरद पाटील यांच्या ऐतिहासिक योगदानाची आवश्यकता आहे.

**** संशोधन पद्धती व साधने :***

१) प्राथमिक स्त्रोत – शोधप्रबंधाचा विषय हा कॉ. शरद पाटील यांच्या इतिहास लेखनातील योगदानावर असल्याने त्यांनी लेखन केलेल्या संशोधन ग्रंथांचा, पुस्तिकांचा, सत्यशोधक मार्क्सवादी मासिकांचा अभ्यास करून प्रकरणांनुसार माहितीचे संकलन संशोधक करणार आहे.

२) दुय्यम स्त्रोत – कॉ. शरद पाटील यांनी साक्री व नवापूर या आदिवासी बहूल तालुक्यात उभे केलेले लढे, मोर्चे, सभा, अभ्यास शिबीरे, भाषणे, वृत्तपत्रांमधील लेखन, साप्ताहीके व नियतकालिकांमधील लेख यातूनही शोधप्रबंधांच्या अनुषंगाने येणाऱ्या तथ्यांचे संकलन केले जाईल.

३)संगणक तंत्राचा वापर – संगणक या आधुनिक तंत्राचा शोधप्रबंधाच्या सर्व प्राथमिक आणि दुय्यम अप्रकाशित–प्रकाशित स्त्रोतांमधून संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण केले जाईल. प्रस्तुत विषयाच्या पहिल्या सहमाही प्रगती अहवालापासून संगणक तंत्राचा उपयोग करून शोघप्रबंधाला अंतिम स्वरूप देण्यात येईल.

**** विश्लेषण पद्धती :***

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या लेखनाकरिता सर्वसाधारण ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग तसेच आंतरविद्याशाखीय संशोधन पद्धतीचा उपयोग करून कॉ. शरद पाटील यांचे इतिहास लेखनातील योगदानावर लेखन केले जाईल.

*** संशोधन आराखडा**

प्रकरण पहिले – प्रस्तावना

प्रकरण पहिले हे प्रस्तावनेचे विवेचन करणारे असून त्यात प्रस्तुत संशोधन विषयाचे प्रयोजन तसेच मला प्रस्तुत विषयाची प्रेरणा कशी मिळाली, या विषयाची निवड मी संशोधनासाठी का केली ? या विषयीची पार्श्वभूमी स्पष्ट करणार आहे. तसेच संशोधक म्हणून माझे मत काय असेल, संशोधनासाठी मी कोणत्या पद्धतींचा अवलंब केला आहे हे माझ्या शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकारणात मी विशद करणार आहे. शोधप्रबंधाच्या प्रस्तुत प्रकरणामध्ये पुढे ''कॉ. शरद पाटील यांच्या इतिहास लेखन कार्याचा अभ्यास'' या विषयाचे स्वरूप व व्याप्ती इत्यादी बाबींचाही अभ्यास करणार आहे.

प्रकरण दुसरे – पूर्ववृत्त

शोधप्रबंधाच्या 'पूर्ववृत्त' ह्या प्रकरणात कॉ. शरद पाटील यांचे बालपण, शिक्षण असा जीवनपरिचय देणार आहे. तसेच विद्यार्थी दशेपासूनच ते साम्यवादी विचारांकडे कसे आकर्षिले गेले, वयाच्या अवघ्या

२० व्या वर्षापासूनच जीवनदानी कम्युनिस्ट कार्यकर्ते म्हणून कार्य कसे करू लागले, त्यांच्यावर साम्यवादी विचारांचा प्रभाव कसा पडला आणि त्यांची स्वत:ची विचारसरणी या सर्व बाबींचा अभ्यास संशोधनकर्ता या प्रकरणामध्ये करणार आहे.

प्रकरण तिसरे– कॉ. शरद पाटील यांचे प्राच्यविद्यापंडित म्हणून इतिहास लेखन

कॉ. शरद पाटील यांची महाराष्ट्रातच नव्हेतर राष्ट्रीय पातळीवर प्राच्यविद्यापंडित म्हणून मोठी ख्याती आहे. त्यांच्या संस्कृत भाषेवरील प्रभुत्वामुळे त्यांनी प्राचीन साहित्याचा सखोल अभ्यास करून इतिहास लेखनात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. बुद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून ते बुद्धाची तात्त्विकता विसंगत असल्याचे दाखवितात. कारण बुद्ध अंधरुढींचा विरोध करीत असतांनाच काही रितीरिवाजांचा स्वीकार करतात असे असले तरी ती काळाची आणि समाजव्यवस्थेची गरज असल्याचे मत कॉ. शरद पाटील नोंदवितात. आपल्या देशाच्या हजारो वर्षाच्या इतिहास लेखनावर ब्राह्मणी वर्गाचेच प्राबल्य व वर्चस्व राहिल्यामुळे त्यांनी सिंधुसंस्कृती, रामायण–महाभारत काल, बुद्ध काल यामधील सामाजिक संघर्ष, वर्णसंघर्ष, दास–स्वामी संघर्ष यातील वास्तव समाजासमोर येवू दिले नाही. स्त्री–शूद्रातिशूद्रांच्या विद्रोही प्रवाहातील नायक–नायकांची परिवर्तनीय कामगिरीचे वास्तव स्वरूप हेतूपुरस्कर विकृत केले. अशा पार्श्वभूमीवर कॉ. शरद पाटील यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मंथनातून वर्णजातीय हितसंबंधावर हल्ले चढवून अब्राह्मणी परंपरांना ऐतिहासिक भौतिक वादाची जोड देवून एका नव्या अन्वेषणपद्धतीला समाजसमोर आणले. आजपर्यंत प्रभू राम विरुद्ध राक्षस–शूद्र रावण यांचा सघर्ष म्हणजे रामायण आणि परमेश्वर कृष्णप्रणीत पांडवांविरुद्धचा राक्षसांचा अवतार असलेल्या कौरवांचा संघर्ष म्हणजे महाभारत असल्याचे ब्राह्मणी प्रबोधन कार्य हजारो वर्षापासून चालत आले. मात्र कॉ. शरद पाटील यांनी राम विरुद्ध सीता आणि पांडवांविरुद्ध द्रौपदी म्हणजेच रामायण आणि महाभारतातील अंतरिक संघर्ष असल्याचे अब्राह्मणी सूत्र ठरवून लेखन केले. याच बाबींचा अभ्यास या प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

प्रकरण चवथे – मार्क्सवादी–फुले–आंबेडकरी विचारधारा आणि कॉ. शरद पाटील

कॉ. शरद पाटील कम्युनिस्ट नेते असलेत, त्यांनी कम्युनिस्ट चळवळीमध्ये योगदान दिले असले तरी जागतिक पातळीवरील साम्यवादी विचार किंवा मार्क्सवादी विचारसरणीचा जसाच्या तसा स्वीकार करणे त्यांना पटणारे नव्हते. कारण पाश्चात्य समाजरचना व भारतीय समाजरचना यात मोठा फरक होता. आर्थिक समतेबरोबरच सामाजिक समताही आवश्यक होती. म्हणूनच कॉ. शरद पाटील यांनी साम्यवादी विचारसरणीची मांडणी करतांना मार्क्सवादी तत्त्वज्ञानाची फुले–आंबेडकरवादी

विचारसरणीशी सांगड घातली. त्यांच्यापुढे बुद्धाच्या सामाजिक समतेचा आदर्श होता. म्हणूनच त्यांनी भारतीय समाजाची आवश्यकता लक्षात घेवून नवी वैचारिक मांडणी केली. आपल्या या अब्राह्मणी तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी तयार करतांना म. फुले व डॉ. आंबेडकरांच्या दास्यमुक्तीचा विचार स्वीकारला होता. डॉ. आंबेडकरांनी व म. फुले यांचा वर्णजाति अंताचा लढा अतिशूद्रापर्यंत पोहचविला. बुद्ध व फुले यांना अभिप्रेत स्त्रीशूद्रातिशूद्राच्या मुक्तीचा वसा स्वीकारून डॉ. आंबेडकरांनी लढे उभारलेत. मनुस्मृतीचे दहन करून सामाजिक क्षेत्रात क्रांतिकारी पाऊल टाकले. हिंदू धर्मात राहून दास्य मुक्तीच्या प्रयत्नांना यश येत नसल्याचे लक्षात येताच धर्मांतर करून जातीय व वर्गीयविरोधी लढ्यांचे नेतृत्व स्वीकारले हाच सैद्धांतिक मार्ग कॉ. शरद पाटील यांनी स्वीकारला. या सैद्धांतिक आणि तात्त्विक वाटचालीचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करणार आहे.

प्रकरण पाचवे – कॉ. शरद पाटील यांचे स्त्रीवादी इतिहास लेखन.

आपल्या देशाच्या ऐतिहासिक वाटचालीत स्त्रियांच्या योगदानाला मोठे महत्त्व आहे. प्राचीन काळात तर आपल्या देशात स्त्रीसत्ताक कुटूंब आणि समाजव्यवस्था अस्तित्वात होती. जगभराच्या मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त करून देणारा शेतीचा शोध हा स्त्रियांनीच लावला आहे. स्त्री ही कुलप्रमुख सर्वमान्य होती. कुटुंबाची पर्यायाने समाजाची भरभराट होण्यामध्ये स्त्रियांचे मोठे योगदान होते. कारण भरघोस पिकांचे उत्पादन येण्यासाठी स्त्रिया यज्ञ करीत. कुटुंबापासून ते संस्थात्मक अशा व्यापक वाटचालीत पालनकर्ती म्हणून स्त्रियांना प्रतिष्ठेचे स्थान होते. कुटुंबाला पर्यायाने आपल्या समाजाला वात्सलतेच्या रूपात स्वत: झिजवून स्थैर्य मिळवून देणाऱ्या स्त्रीला महत्त्वाचे स्थान होते. कॉ. शरद पाटील यांनी आपल्या लेखनात गणिका, वैदेही सीता, रामाकडून स्त्रीसत्ताकतेला झालेला उच्छेद, शूर्पणखाचे कृषिसंपन्नतेकरिता आदर्श धर्म, बहुपत्नित्व विवाह पद्धती, आदिवासी स्त्रिया आणि हिंदू कोड बील अशा महत्त्वपूर्ण बाबींवर संशोधनात्मक लेखन केले आहे. त्यांच्या या स्त्रीवादी इतिहास लेखनाचा अभ्यास शोधप्रबंधाच्या प्रस्तुत प्रकरणात करणार आहे.

प्रकरण सहावे – आदिवासी इतिहास लेखनातील कॉ. शरद पाटील यांचे योगदान

आपल्या देशातील आदिवासी जमातींना जात्यन्तक क्रांतीशी काहीही घेणे–देणे नाही. कारण धर्मशास्त्रानुसार ते जातीयवादाचे बळी ठरविले गेले नाहीत. अस्पृश्य किंवा अतिशूद्र म्हणून त्यांना अपमानास्पद वागणूक मिळण्याचे काही कारणही नाही. त्यांना फक्त जमीन या अर्थ कारणाकरिता शासनाशी लढा द्यावयाचा आहे. आदिवासी जमाती ह्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या पलिकडील घटक आहे. मात्र जमीनीच्या प्राप्तीकरिता त्यांनी शासनाशी लढा नक्षलवाद्यांच्या स्वरूपात दिला आहे. तसेच हिंदू कोड बिलानुसार सामाजिक प्रथा–परंपरानुसार हक्क मिळाले नाहीत. हे हक्क आदिवासी महिलांनाही मिळावेत

म्हणून कॉ. शरद पाटील यांनी प्रबोधनातून प्रयत्न केले आहेत. आदिवासी समाजाच्या उत्थापनाकरिता कॉ. शरद पाटील यांनी साहित्य निर्मितीचाही आग्रह धरला आहे. तसेच डाकीण सारख्या क्रूर प्रथेविरुद्ध प्रबोधनात्मक उपक्रम राबविलेत. भूमिहीन आदिवासींना जंगल जमीनीचे वाटप झाले पाहिजे. पश्चिम भारतीय स्वायत्त आदिवासी राज्याची मागणी, स्वतंत्र राज्य व विद्यापीठाची मागणी, जंगलखेडू आंदोलने याविषयी जाणिवपूर्ण लेखन करून कॉ. शरद पाटील यांनी निर्माण केलेल्या जाणिवांचा सविस्तर अभ्यास प्रस्तूत प्रकरणात करणार आहे.

प्रकरण सातवे – कॉ. शरद पाटील यांची मराठा इतिहास लेखनातील भूमिका

शिवचरित्राचा अभ्यास करीत असतांना जाणता राजा म्हणून छत्रपती शिवरायांमध्ये अनेकविध उच्चतम गुणांचा समावेश असल्याचे अनेक प्रसंगावरून दिसून येते. तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करीत असतांना शिवरायांचा धार्मिक दृष्टिकोन हा काळाच्याही पुढे असल्याचा प्रत्यय येतो. म्हणूनच महाराजांच्या लोकप्रिय दृष्टिकोनांपैकी धार्मिक आकलन अधिक लोकप्रिय होते. कारण महाराज धार्मिक असले तरी सर्वधर्मसमभाव हा त्यांचा प्रशासकीय स्थायीभाव होता. म्हणूनच सिद्धी इब्राहिम, सिद्धी हिलाल, दर्यासारंग इब्राहिमखान व दौलतखान, मदारी मेहतर सारखे अनेक इमानदार सेवक हे मुस्लिम होते. शिवरायांच्या तांत्रिक राज्याभिषेकामागील प्रचलित कारणमिमांसा कॉ. शरद पाटील फेटाळून लावतांनाच म्हणतात की, या राज्याभिषेकामुळे शूद्रातिशूद्र जातीजमातींचा पाठिंबा शिवरायांना मिळवायचा होता. तसेच तांत्रिक राज्याभिषेक शैवविवाहाशिवाय होवू शकत नसल्याने शिवरायांनी अस्पृश्य स्त्रीशी विवाह केला असल्याचे लिहितात. ब्राह्मणी व्यवस्थेला विरोध करून बजाजी निंबाळकरांचे शूद्धीकरण करून घेतले. ब्राह्मणवादाला शह देण्याकरिता शिवरायांनी अब्राह्मणी शाक्तपंथ स्वीकारला होता. म्हणूनच निश्चलपुरीस शिवरायांनी गुरू मानले होते. शिवरायांनी अब्राह्मणी समताधर्माचा स्वीकार करून जातिव्यवस्थेला विरोध केला. कर्नाटक मोहिमेप्रसंगी महाराजांनी संभाजी महाराजांना शृंगारपूर येथे पाठविले. यात ब्राह्मणी कारस्थानापासून धोका होता हे शिवरायांनी ओळखले होते. एवढेच नव्हे तर संभाजी महाराजांनी शाक्त पंथाचा स्वीकार केला असल्यामुळेच त्यांचे प्रजा वात्सल्य पाहून ब्राह्मणी अधिकाऱ्यांकडून त्यांची बदनामी करून शिवरायांचे कसे कान भरले हे कॉ. शरद पाटील यांनी साधार स्पष्ट केले. महत्त्वाचे म्हणजे रायगडावर शिवरायांच्या मृत्यूविषयी मत देतांना कॉ. शरद पाटील म्हणतात, ''शिवाजीची शोकांतिका ही भारतीय इतिहासातील जातिव्यवस्थाविरोधी संघर्षाचे महानाट्य आहे.'' याचा खुलासा करून नवा प्रकाश टाकला आहे. मराठा इतिहास लेखनातील अशा महत्त्वपूर्ण बाबींचा अभ्यास शोधप्रबंधाच्या प्रस्तुत प्रकरणात संशोधक करणार आहे.

प्रकरण आठवे – उपसंहार – निष्कर्ष

उपसंहार असलेल्या सातव्या प्रकरणामध्ये कॉ. शरद पाटील यांच्या इतिहास लेखन कार्याचा सारांश देणार आहे. कॉ. शरद पाटील यांचे प्राच्यविद्यापंडित म्हणून लेखन, मार्क्सवादी–फुले–आंबेडकरी विचारधारा, स्त्रीवादी इतिहासलेखन, आदिवासी इतिहास लेखन, मराठा इतिहास लेखनातील भूमिका अशा विविध कार्यांचे संशोधनात्मक मूल्यमापन संशोधक करणार आहे. प्रस्तूत विषयावरील शोधप्रबंधाच्या लेखनाकरिता अस्सल / प्रकाशित आणि दुय्यम साधनांचा उपयोग करणार आहे. कॉ. शरद पाटील यांच्या विविध स्वरुपातल्या लेखन कार्याची माहिती अभ्यासकांना व समाजाला व्हावी असा प्रामाणिक उद्देश संशोधक या विषयाच्या संशोधनातून साध्य करणार आहे.

**** परिशिष्ट्ये***

**** संदर्भग्रंथ सूची***

संदर्भ सूची

अस्सल प्रज ाशित साधÛ

मराठी

मासिजे

१) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** सप्टेंबर १९८२, वर्ष-१, अंज -७.

२) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** ऑक्टोबर १९८२, वर्ष-१, अंज -८.

३) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** -ोव्हेंबर १९८२, वर्ष-१, अंज -९.

४) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** डिसेंबर १९८२, वर्ष-१, अंज -१०.

५) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जा-ेवारी १९८३, वर्ष-१, अंज -११.

६) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** मे/जू-ा १९८३, वर्ष-२, अंज -१५/१६.

७) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** -ोव्हेंबर १९८३, वर्ष-२, अंज -२१.

८) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जा-ेवारी १९८४, वर्ष-२, अंज -२३.

९) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जू-ा १९८४, वर्ष-३, अंज -४.

१०) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जुलै १९८४, वर्ष-३, अंज -५.

११) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** ऑजस्ट/सप्टेंबर १९८४, वर्ष-३, अंज -५/६.

१२) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** डिसेंबर/जा-ेवारी १९८४-८५, वर्ष-३, अंज -१०/११.

१३) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** सप्टेंबर/ऑक्टोबर १९८५, वर्ष-४, अंज -७ व ८.

१४) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** मे/जू-ा १९८६, वर्ष-५, अंज -३ व ४.

१५) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** सप्टेंबर १९८६, वर्ष-५, अंज -७.

१६) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** ऑक्टोबर/-ोव्हेंबर १९८६, वर्ष-५, अंज -८-९.

१७) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** डिसेंबर १९८६, वर्ष-५, अंज -१०.

१८) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जा-ेवारी/फेब्रुवारी १९८७, वर्ष-५, अंज -११-१२.

१९) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** मार्च १९८७, वर्ष-६, अंज -१.

२०) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** एप्रिल १९८७, वर्ष-६, अंज -२.

२१) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** मे १९८७, वर्ष-६, अंज -३.

२२) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जुलै १९८७, वर्ष-६, अंज -५.

२३) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** ऑजस्ट १९८७, वर्ष-६, अंज -६.

२४) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** सप्टेंबर १९८७, वर्ष-६, अंज -७.

२५) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** ऑक्टोबर/-ोव्हेंबर १९८७, वर्ष-६, अंज -८-९.

२६) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** डिसेंबर १९८७, वर्ष-६, अंज -१०.

२७) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जा-ेवारी १९८८, वर्ष-६, अंज -११.

२८) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** फेब्रुवारी १९८८, वर्ष-६, अंज-१२.
२९) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** मार्च १९८८, वर्ष-१, अंज-७.
३०) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जुलै-ऑजस्ट १९८८, वर्ष-७, अंज-५-६.
३१) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** -ोव्हेंबर/डिसेंबर १९८८, वर्ष-७, अंज-९-१०.
३२) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** जा-ेवारी/फेब्रुवारी १९८९, वर्ष-७, अंज-११-१२.
३३) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** मार्च १९८९, वर्ष-८, अंज-१.
३४) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** ऑजस्ट/सप्टेंबर १९८९, वर्ष-८, अंज-६-७.
३५) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** ऑक्टोबर/-ोव्हेंबर १९८९, वर्ष-८, अंज-९.
३६) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** डिसेंबर १९८९-जा-ेवारी १९९०, वर्ष-८, अंज-१०-११.
३७) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** फेबुवारी-मार्च-एप्रिल-मे १९९०, वर्ष-९, अंज-१२.
३८) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** फेब्रुवारी-मार्च १९९२, वर्ष-११, अंज-२-३.
३९) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** एप्रिल-मे १९९२, वर्ष-११, अंज-४-५.
४०) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** ऑजस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर १९९२, वर्ष-११, अंज-८,९,१०.
४१) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** -ोव्हेंबर-डिसेंबर १९९२, वर्ष-११, अंज-११-१२.
४२) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी*** (विशेषांज), फेब्रुवारी २००१, वर्ष-१, अंज-२.
४३) जॉ. शरद पाटील, ***सत्यशोधज मार्क्सवादी,*** (स्त्रीमुक्ती विशेषांज), १९८५.
४४) ***व्या धोरजासाठी संघर्ष,*** सत्यशोधज जम्युनिस्ट पज प्रजाश-ा, धुळे, सप्टेंबर १९८०.

संदर्भ ग्रंथ :

१) पाटील शरद, ***सत्यशोधज जम्युिस्ट पजाचे धोरजात्मज िवेद व घटा,*** शरद पाटील प्रजाश-ा, धुळे, १९८०.
२) पाटील शरद, ***व्या धोरजांसाठी संघर्ष,*** सत्यशोधज मार्क्सवादी प्रजाश-ा, धुळे, १९८०.
३) पाटील शरद, ***रामायज महाभारतातील वर्जसंघर्ष,*** सत्यशोधज मार्क्सवादी प्रजाश-ा, धुळे, १९८६.
४) पाटील शरद, ***दासशूद्रांची जुलामजिरी, जंड १, भाज १,*** प्राज्ञ प्रजाश-ा, वाई, १९८२.
५) पाटील शरद, ***दासशूद्रांची जुलामजिरी, जंड १, भाज २,*** प्राज्ञ प्रजाश-ा, वाई, १९८७.
६) पाटील शरद, ***मार्क्सवाद फुले आंबेडजरवाद,*** सुजावा प्रजाश-ा, पुजे, १९९३.
७) पाटील शरद, ***शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे जरे शत्रू जोज : महंमदी जी ब्राह्मजी ?*** जंड २, भाज २, मावळाई प्रजाश-ा, शिरूर, २०१०.

८) पाटील शरद, ***जातिव्यवस्थाज सामंती सेवज त्व***, सुजावा प्रज ाश-ा, पुजे, १९९६.

९) पाटील शरद, ***जात्य तज भांडवलदारी लोज शाही प्र ांती व तिची समाजवादी पूर्ती***, सुजावा प्रज ाश-ा, पुजे, २००३.

१०) पाटील शरद, ***मांतर औरंजाबाद आजि पुज्याचे,*** मावळाई प्रज ाश-ा, शिरूर, २०११.

११) पाटील शरद, ***प्रिमिटिव्ह ज मुर्या झम, मातृसत्ता त्रीसत्ता आजि भारतीय समाजवाद, जंड ४***, मावळाई प्रज ाश-ा, शिरुर (जि. पुजे), २०१२.

१२) पाटील शरद, ***शोध मूल िवासींचा ज्री शूद्र वर्जाचा ज्री जात्यंतज समतेचा ?,*** मावळाई प्रज ाश-ा, शिरुर (जि. पुजे), २०१२.

१३) पाटील शरद, ***बुद्ध, भिक्जु आ ंद, विशाजा,*** सत्यशोधज मार्क्सवादी प्रज ाश-ा-१, धुळे, दुसरी आवृत्ती, फेब्रुवारी १९८९.

१४) पाटील शरद, ***बुद्ध व भिक्जु आ ंद***, सत्यशोधज मार्क्सवादी प्रज ाश-ा-१, धुळे, डिसेंबर १९८३.

१५) पाटील शरद, ***बुद्ध : भारतीय इतिहासातील लोज शाही स्वातंत्र्य व समतेचा अज ास्त्रोत !***, सावित्रीबाई फुले प्रज ाश-ा, येवला, १९९९.

इंज्रजी

1. Patil Sharad, ***Caste-ending Bourgeois Democratic Revolution & its Socialist Consummation***, Mavalai Prakashan, Shirur, 2005.
2. Patil Sharad, ***Caste Feudal Servitude,*** Mavlvai Prakarashan, Shirur, 2006.
3. Privitive Communism, ***Matriachy-Gnyocracy and Modern Socialism,*** Vol. IV, Mavlai Prakashan, Shirur, 2010.

दुय्यम साध

१) ज सबे रावसाहेब, ***आंबेडज र आजि मार्क्स,*** सुजावा प्रज ाश-ा, पुजे, १९८५.

२) जोशी तर्ज तीर्थ लज्मजशास्त्री, ***मराठी विश्वज ोश, जंड १ ते १८,*** महाराष्ट्र राज्य, साहित्य संस्ज ृती मंडळ, मुंबई, १९७६.

३) पवार जयसिंजराव, ***आधु ज जजाची संस्ज ृती आजि इतिहास,*** मंजुश्री प्रज ाश-ा, ज ोल्हापूर, १९९३.

४) पवार जयसिंजराव, ***अर्वाचि भारताचा आजि चि ्वा इतिहास,*** मंजुश्री प्रज ाश-ा, ज ोल्हापूर, १९९५.

५) पळशीज र सुहास, ***सत्याज्रही समाजवाद आचार्य जावडेज र ि वडज लेजसंज्रह***, महाराष्ट्र राज्य साहित्य आजि संस्ज ृती मंडळ, मुंबई, १९९४.

६) पाटजज र भारत, ***जातिव्यवस्थेचा अंत,*** ि र्मिती विचारमंच, ज ोल्हापूर, २००९.

७) पाटील विजय, ***सत्यशोधज ज म्यु स्ट पज : एज अभ्यास,*** अप्रज ाशित पीएच. डी. शोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, ज ोल्हापूर, २००३.

८) भोळे भा. ल., ***आधु ज भारतातील राजज ीय विचार,*** ज ॉ-टि-ो-टल प्रज ाश-ा, पुजे, १९७८.

९) मोरे विठ्ठल, ***महाराष्ट्रातील राजज ारज आजि मार्क्सवादी ज म्यु स्ट पज,*** ज ैलास पब्लिज ेश-ा, औरंजाबाद, १९९५.

१०) मोरे शंजरराव, ***भारतीय शेतजरी जामजार पज, आढावा व आराजडा,*** जुरुंदवाड, जोल्हापूर, १९९८.

□यतजालिजे, संशोध□ पत्रिजा व वृत्तपत्रे

१) अस्मितादर्श (औरंजाबाद)

२) दैनिज आपला महाराष्ट्र, धुळे आवृत्ती

३) दैनिज लोजमत, धुळे आवृत्ती

४) दैनिज सजाळ, धुळे आवृत्ती

उपरिनिर्दिष्ट प्राथमिक साधने व संदर्भ ग्रंथांची यादी फक्त रूपरेषेसाठी दिलेली आहे. याशिवाय शोधप्रबंधांच्या लिखाणासाठी मी महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेखागारात तसेच महाराष्ट्रातील विविध ग्रंथालयांमध्ये, वाचनालयांमध्ये व इतिहास संशोधन संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या प्राथमिक साधनांचा तसेच संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करणार आहे. शोधप्रबंधाचे शेवटी छायाचित्रे परिशिष्ट्ये जोडणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे साधनांच्या उपलब्धतेनुसार शोधप्रबंधांच्या प्रकरणांमध्ये बदल करण्यात येईल.

संशोधक

प्रा. अनिल प्रभाकर निकम
इतिहास विभाग,
ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. म. दि. सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब
कला, वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा,
ता. शिंदखेडा, जि. धुळे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शारदा बंडे
इतिहास विभाग प्रमुख
स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय,
पूर्णा (जं.), जि. परभणी

संशोधनाचा आराखडा

‘‘कॉ. शरद पाटील यांच्या इतिहास लेखन कार्याचा अभ्यास’’

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयाच्या
पीएच्. डी. पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला सादर करण्यात येणाऱ्या
संशोधनाचा आराखडा

✻ संशोधक ✻

प्रा. अनिल प्रभाकर निकम

इतिहास विभाग,
ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै.म.दि.सिसोदे ऊर्फ भाऊसाहेब कला, वाणिज्य महाविद्यालय,
नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे

✻ मार्गदर्शक ✻

डॉ. शारदा बंडे

इतिहास विभाग प्रमुख
स्वा. सै. सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पुर्णा (जं.)
ता. जि. परभणी

२०१७